शुक्रवार
३१.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २९४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक

# मराठवाडा पत्र

छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे








marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955



# मनोज जरांगेंचं उपोषण स्थगित

## आमच्या मागण्या मान्य न केल्यास मुंबईत आंदोलन

बीड, (प्रतिनिधी):-मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे यांचं उपोषण आता स्थगित करण्यात आलं आहे. भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी त्यांना ज्युस दिला आणि त्यांचं उपोषण सोडवलं. सरकारचे प्रतिनिधी म्हणून अंतरवाली सराटीत आलेल्या आमदार सुरेश धस यांच्याहस्ते ज्यूस पिऊन मनोज जरांगेंनी उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा केली. मात्र, याचवेळी सरकारने आमच्या मागण्यांसदर्भात लवकरच निर्णय न घेतल्यास पुढील आंदोलन राजधानी मुंबईत करणार असून त्याचीही घोषणा केली जाईल, असा इशाराच सरकारला दिला आहे. आमदार सुरेश धस, खासदार बजरंग सोनवणे आणि प्रकाश सोळंकी यांच्या उपस्थितीत मनोज जरांगे यांनी ज्यूस पिऊन उपोषण सोडलं. यावेळी, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हेही उपस्थित होते. ▶▶पान २ वर



### सगे-सोयऱ्यांची अमलबजावणी न केल्यास मुंबईत आंदोलन

सग्या सोयऱ्यांची अमलबजावणी आम्हाला पाहिजेच आहे. ती झाली नाही तर आता लवकरच मुंबईतल्या आंदोलनाची तारीख जाहीर करणार असल्याचंही मनोज जरांगे म्हणाले. मुंबईत जर आंदोलन सुरु केलं तर तिथून काही माघार घेणार नाही.आपल्याला मुंबईला पोलिसांनी मारलं तरीही पोलिसांना बोट लावायचं नाही. पण, मंत्र्यांना आणि त्यांच्या पोरांना धरायचं आणि हाणायचं असा इशाराच मनोज जरांगेंनी दिला. तसेच, आता हे आंदोलन स्थगित करत आहे, या जागेवर सभामंडप करायचा आहे. यापुढे शक्यतो आता उपोषण करायचं नाही, समोरासमोर लढायचं आहे. लवकर अमलबजावणी न झाल्यास मुंबईची तारीख जाहीर करेन, तेव्हा मुंबई जाम होऊ शकते, यावेळी मराठे मागे येऊ शकत नाहीत, असंही मनोज जरांगे म्हणाले.

# सकारात्मक राहून बीडचे वातावरण बदला

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन






1. पालकमंत्री पद स्वीकारल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा हा पहिलाच बीड दौरा होता.
2. बैठकीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय तसेच लगतच्या परिसरात कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला होता.
3. सभेच्या निमिताने २ वर्षाच्या कालावधीनंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील लिफ्ट सुरु करण्यात आली.
4. बैठकी बाबत सर्वांनाच उत्सुकता होती त्यामुळे विविध वाहिन्यांचे प्रतिनिधी या ठिकाणी सकाळपासूनच उपस्थित होते.
5. पुढील बैठकीपूर्वी किमान १० दिवस आधी सदस्यांना इतिवृत् कळवून त्याबाबत पूर्वतयारी
6. आढावा बैठक जिल्हाधिकारी यांनी घ्यावी जेणे करुन मुख्य बैठकीचा वेळ वाचेल, अशी सूचना उपमुख्यमंत्र्यानी यावेळी केली.
7. आजच्या सभेत सर्व आढावा झाल्यानंतर श्री पवार यांनी प्रत्येक सदस्याला म्हणणे मांडण्याची संधी दिली. या सर्व सूचना पालक सचिवांनी आढावा घेत मुंबईत पाठवाव्यात असेही निर्देश यावेळी दिले.

## जिल्हा नियोजन समितीची सभा संपन्न; जानेवारी अखेर १५४.३५ कोटी खर्च

बीड, (प्रतिनिधी):- सर्व प्रतिनिधींनी सकारात्मक भूमिका ठेवून काम केल्यास बीड बाबत सर्वत्र निर्माण झालेले वातावरण बदलेल असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. प्रतिमा बदलली तर बीडमध्ये गुंतवणूक येईल व रोजगार वाढेल असेही म्हणाले. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली येथील नियोजन सभागृहात चालू वर्षाचा नियोजन आराखडा आणि त्यात आतापर्यंत झालेल्या खर्चाची स्थिती याचा आढावा घेण्यात आला.

जिल्ह्यात सर्वसाधारण योजनेचा आराखडा ४८४ कोटीचा असून अनुसूचित उपयोजना आराखडा १२९ कोटींचा आहे. यासोबतच ओटीएसपी अंतर्गत २ कोटी ५० लक्ष अशी एकूण ६१५ कोटी ५० लाखांचा नियतव्यय मंजूर आहे. यात सर्वसाधारण अंतर्गत चार ४६७.७० कोटी रुपयांच्या च्या कामांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. यंत्रणांना १२५.३९ कोटी (एकूण रकमेच्या ४० टक्के) निधी वितरित करण्यात आलेला आहे. ज्यात जानेवारी अखेर १२३.३ कोटी खर्च झाला आहे. एकूण आराखड्यातील ५३६.४४ कोटींच्या कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली असून त्यातील वितरित एकूण निधी १५६.४८ कोटी व खर्च १५४.३ कोटी इतका आहे. ▶▶पान २ वर

### जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत

## धनंजय मुंडेंनी मांडला ५ वर्षांचा हिशोब

बीड, (प्रतिनिधी):- बीड जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा जिल्ह्याचे माजी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मागील पाच वर्षातील त्यांच्या चार वर्षाच्या पालकमंत्री कार्यकाळातील कामकाजाचा लेखाजोखा आज उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर बैठकी दरम्यान मांडला. मागच्या पाच पैकी चार वर्षे मी बीड जिल्ह्याचा पालकमंत्री होतो. त्यात साधारण दोन ते अडीच वर्षे ही कोविड मध्ये गेली. त्या काळात रुग्णांना तातडीचे योग्य उपचार मिळवून देणे तसेच लोकांचे प्राण वाचवणे आरोग्य यंत्रणा अधिक बळकट करणे ही कामे प्राधान्याने करत कोविडच्या काळामध्ये जिल्ह्यातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करण्यात आले. अनेक कोविड सेंटर विविध वैद्यकीय साहित्य त्याचप्रमाणे रुग्णवाहिका अशा आरोग्य यंत्रणांना बळकटी देणाऱ्या बाबींवरती मोठ्या प्रमाणात जिल्हा नियोजन समितीचा निधी त्याकाळी खर्च केला गेला, अशी माहिती धनंजय मुंडे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात दिली. बीड जिल्ह्यात राबविलेला पिक विमा पॅटर्न, विमा देण्यास टाळाटाळ करणाऱ्या कंपनीच्या विरोधात फौजदारी खटला दाखल करणे, विविध नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देणे, अशी अनेक कामे केली. २०२४ सालचे अतिवृष्टी अनुदान मंजूर होऊन आलेले आहे, त्याचे वितरण लवकर पूर्ण केले जावे असेही धनंजय मुंडे म्हणाले. याच काळात जिल्ह्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत



सुमारे ११०० किमी रस्त्यांच्या विकासाचे काम पूर्ण झाले. पंकजाताई मुंडे यांच्या पालकमंत्री कार्यकाळात मंजूर होऊन सुरू झालेले जिल्हा परिषद इमारत बांधकाम पूर्णत्वास गेले. पंकजाताई मुंडे यांचे पाच वर्ष व त्यापुढे मला मिळालेला ४ वर्षांचा कालावधी यात, आम्ही सर्वसमावेशक विकास साधण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. जिल्हाधिकारी कार्यालय बांधकाम सुरू आहे. मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरू आहे. परळी ते बीड या महत्त्वाच्या रस्ता रुंदीकरणचे काम सुरू आहे. यांसह जिल्ह्यात न्यायलये, प्रशासकीय इमारती, विश्रामगृह, शासकीय रुग्णालयांच्या दर्जा उन्नती व बांधकाम असे अनेक महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांची कामे या काळात केली गेली तर अनेक कामे सध्या प्रगतीपथावर आहेत, कृषी भवन, महिला व बालविकास भवन, सीताफळ इस्टेट अशी अनेक मंजूर असलेली कामे आता दादांच्या नेतृत्वात पूर्णत्वास जातील, अशी अपेक्षा धनंजय मुंडेंनी व्यक्त केली. बीड जिल्हा कुणबी प्रमाणपत्र देण्यात ▶▶पान २ वर

# आ.संदीप क्षीरसागरांकडून डीपीडीसी बैठकीत केले महत्वाचे लोकप्रश्न उपस्थित

## मतदारसंघातील विविध कामांसाठी केली विशेष अतिरिक्त निधीची मागणी


बीड दि.३० (प्रतिनिधी):- राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी (दि.३०) रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघातील लोकांच्या आणि विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले लोकप्रश्न मांडले. तसेच मतदारसंघाच्या विकासासाठी विशेष अतिरिक्त निधीची मागणीही आ.क्षीरसागर यांनी यावेळी केली. गुरुवारी (दि.३०) रोजी बीड जिल्हा नियोजन समितीची, पहिली बैठक महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघाच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न मांडले.



### आ.संदीप क्षीरसागर यांनी केलेल्या मागण्या

* बीडच्या पंचायत समिती आवारामध्ये स्व.आण्णासाहेब पाटील व स्व.विनायकरावजी मेटे साहेब यांचा पुतळा बसविणे. * ३० खाटाचे आयुष रूग्णालय छठक्चअंतर्गत २०१९ ला बीडसाठी मंजुर आहे. त्यासाठी शासकीय जमीन बीड शहरातील इमामपुर रोडवरील गट नं.३४-३५ व पारगाव जप्ती या शिवारात उपलब्ध आहे.यासाठी कार्यवाही व्हावी. * नगर परिषदेकडे महावितरणची ३६ कोटी जास्त रूपयांची थकबाकी आहे. त्या संदर्भात जनहित याचिका देखील दाखल आहे. नगरपरिषदेच्या सोलार प्रकल्पाची विद्युत निर्मिती होते ▶▶पान २ वर

# दुसरा 'जीएसटी'!




समान नागरी कायदा या संकल्पनेत काही वाईट नाही. उत्तराखंड या भाजपशासित राज्याने तो अमलात आणला आणि असा समान कायदा आणणारे ते दुसरे राज्य ठरले. पहिले गोवा. पण गोमंतकातील समान नागरी कायद्यात आपल्या कोणत्याही राजकीय पक्षाचा हात नाही. ती पोर्तुगीजांची देणगी. त्या राज्यातील समान नागरी कायद्याबाबत आपले कौतुक करायचेच असेल तर ते पोर्तुगीज गेल्यानंतरही आपण हा कायदा राहू दिला इतपतच करावे लागेल. आता त्यानंतर देवभूमी उत्तराखंडात असा समान नागरी कायदा लागू होईल. वास्तविक सध्याही देशात सर्व नागरिकांस समान फौजदारी दंड संहिता लागू आहे. म्हणजे एखादा गुन्हा हा हिंदू व्यक्तीने केलेला असो वा मुसलमान वा अन्य कोणी. त्याचा खटला धर्मविरहित भावनेने चालवला जातो आणि गुन्हेगार कोणत्या धर्माचा आहे हे पाहून शासन केले जात नाही. गुन्हा मग तो अत्यंत गंभीर शारीरिक इजा इत्यादी असो वा आर्थिक. सर्व धर्मीयांस समान वागणूक मिळते. ही फौजदारी बाबींसंदर्भात लागू असलेली बाब नागरिकांच्या दिवाणी बाबींसही लागू व्हावी अशी मागणी आपल्याकडे सातत्याने होते. भाजपचे तर ते निवडणूक वचन आहे आणि भाजपचे विचारकुल असलेल्या रा. स्व. संघाच्या कार्यक्रमपत्रिकेत ही बाब पहिल्या क्रमांकावर आहे. तेव्हा उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी हा निर्णय घेऊन आपल्या विचारकुलाचे पांग फेडले यात शंका नाही. तथापि कोणतेही चांगले काही करताना अर्धवट काही करायचे ही विद्यमान सरकारची खोड उत्तरांखडच्या या निर्णयातही दिसते. त्यावर भाष्य करण्याआधी समान नागरी कायदा हा देशातील सर्व नागरिकांचे विवाहविधी, संपत्ती हस्तांतर अथवा वारसा इत्यादींस लागू होणे अपेक्षित आहे हे लक्षात घ्यायला हवे. याचा अर्थ असा की एकदा का हा कायदा लागू झाला की उत्तराखंडातील सर्व विवाह, कौटुंबिक संपत्ती हस्तांतर या कायद्यानुसार व्हायला हवे. पण याच मुद्द्यावर हा कायदा माती खातो. कारण असा समान नागरी कायदा त्या राज्यात लागू झाल्यावरही सर्व नागरिक त्याच्या अमलाखाली येणार नाहीत. राज्यातील सर्व अनुसूचित जमातींस या कायद्यातून वगळण्यात आलेले आहे. हा मूर्खपणा करण्याचे कारण काय? एखादी व्यक्ती एखाद्या जाती/जमातीची आहे म्हणून जर तिला स्वतंत्र आयकर आदी सुविधा दिल्या जात नाहीत, तर काही जाती/जमातींस यातून वगळण्याचे कारण काय? या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर आहे त्या त्या जाती/जमातींच्या सांस्कृतिक इतिहासात. त्यात सरकार हस्तक्षेप करू इच्छित नाही. तसा तो केल्यास त्यांचा राजकीय रोष ओढवण्याचा धोका संभवतो. याचा अर्थ पहिल्या घासालाच खडा लागावा तशी या कायद्याची सुरुवातच अपवादाने होणार. तसेच या राज्यांतून अन्य राज्यात स्थलांतर केलेल्यांसही हा कायदा लागू होणार नाही. ते का? धार्मिक रीतिरिवाजांचे पालन केल्यास हिंदू हा हिंदू विवाह कायद्याने बांधील असू शकतो. मग तो कोणत्याही राज्यात का राहीना. उत्तराखंड मात्र यास अपवाद करतो. हे या कायद्याच्या संभाव्य परिणामकारकतेस पडलेले दुसरे भगदाड. यात पंचाईत अशी की हा कायदा काही विशिष्ट तारखेनंतर होणाऱ्या विवाहांस लागू होईल. ते ठीक. पण तो लागू झाल्यानंतर उत्तराखंडी दम्पतीने अन्यत्र स्थलांतर केल्यास काय? की कायद्याचा भंग झाल्यास उत्तराखंडचे पोलीस या आपल्या नागरिक पती-पत्नीस परराज्यातून मुसक्या बांधून आणणार? याव्यतिरिक्त यातील नामांकित आणि उच्च दर्जाचा बिनडोकपणा आहे तो 'लिव्ह इन' पद्धतीने राहणाऱ्यांबाबत. अलीकडे उच्च शिक्षण आणि त्यातून अत्यंत महागडे होत जाणारे जीवनमान यामुळे अनेक तरुण-तरुणी विवाहबंधनात न अडकवून घेता तसेच एकत्र राहतात. हे दोघेही सज्ञान असतील तर ते कसे एकत्र राहतात याकडे त्यांच्या खिडकीतून पाहण्याची सरकारला गरज काय? तो त्यांना अधिकार दिला कोणी? त्या राज्यातील 'लिव्ह इनोत्सुक' जोडप्यांना यापुढे सरकारदरबारी, अगदी पोलीस स्थानकात जाऊन आपल्या सहवासाची आगाऊ नोंदणी करावी लागेल. इतकेच नाही, तर पोलिसांकडून यासाठी मंजुरीही घ्यावी लागेल. २१व्या शतकात हे असे काही सुचू शकते आणि ते सरकारी पातळीवर अमलातही येऊ शकते या वास्तवदर्शनाने धन्य धन्य व्हावे! असे करण्याऐवजी हे 'लिव्ह इनोत्सुक' समजा राज्य सोडून दुसरीकडेच गेले तर सरकार काय करणार? समजा पोलिसांनी अशी परवानगी नाकारली आणि तरीही ते एकत्र राहात असले आणि उभयतांची एकमेकांविरोधात कसलीच तक्रार नसली, त्यांच्या पालकांसही हे संबंध मान्य असले तर सदरहू पोलीस मनगटे चावत बसणार काय? हे राज्य आणि त्याचे चालक अद्यापही १५व्या वा १६व्या शतकात- बुद्धीने आणि मनानेही- वावरत असावेत असे बलात्कार या अत्यंत घृणास्पद गुन्ह्याबाबत हा कायदा जे करतो त्यातून दिसून येते. एखाद्या पुरुषाने परस्त्रीवर लैंगिक अत्याचार केल्यास त्याची पत्नी अशा पुरुषापासून घटस्फोट मागू शकते. ते योग्यच. पण एखाद्या स्त्रीने असा बलात्काराचा आरोप स्वत:च्या पतीवर केल्यास ते मात्र घटस्फोटाचे कारण होऊ शकत नाही. म्हणजे या मुद्द्यावरही समान नागरी कायदा बारगळतो. यात आणखी एक मेख आहे. या धामी यांस तिचा अंदाज कितपत हे ठाऊक होणे अवघड. पण या समान नागरी कायद्यास खरा आणि मोठा विरोध हा हिंदूंकडूनच होऊ शकतो हे उत्तराखंडी सरकारास ठाऊक आहे काय? कारण सद्या:स्थितीत फक्त हिंदूंनाच उपलब्ध असलेली 'अविभक्त कुटुंब' म्हणवून घेण्याची आणि त्याद्वारे उत्पन्न आणि त्यामुळे कमी कर आकारण्याची सोय देशव्यापी 'समान नागरी कायद्या'च्या अमलानंतर रद्दबातल होऊ शकते. सद्या:स्थितीत हिंदू, शीख, जैन यांस हा 'हिंदू अविभक्त कुटुंब' म्हणवून घेण्याचा अधिकार आहे. तसे म्हणवून घेतल्यास 'हिंदू अविभक्त कुटुंब' ही स्वतंत्र, करपात्र वैध अस्तित्व (एन्टिटी) मानली जाते आणि त्यास स्वतंत्र 'पॅन' कार्डही दिले जाते. त्यानंतर अशा हिंदू अविभक्त कुटुंबास करपात्र उत्पन्नातून काही उल्लेखनीय वजावटींचा आधार घेता येतो. या अशा अविभक्त कुटुंबातील सर्वांस समान अधिकार मिळतात आणि हे सर्व समान करसवलती उपभोगू शकतात. हा मुद्दा तपशीलवारपणे नमूद केला याचे कारण एकदा का देशभर 'समान नागरी कायदा' अस्तित्वात आला की हिंदू धर्मीय धनाढ्यांस ही अविभक्त कुटुंबाची सोय राहणार नाही. केवळ धार्मिक द्वेषापोटी- म्हणजे मुसलमानांस चार 'बायका' करता येतात या आकसापोटी - 'समान नागरी कायदा' रेटणाऱ्या अनेक बोलघेवड्यांनी आपले किती हिंदू बांधव 'अविभक्त कुटुंब' म्हणवून कर वाचवतात याचाही एकदा अभ्यास करावा. उत्तराखंडात या 'हिंदू अविभक्त कुटुंबांचे' काय होणार याचे उत्तर नाही. या देवभूमीत 'हिंदू अविभक्त कुटुंब' हे वैध अस्तित्व मानले जाणार की नाही, हा प्रश्नच. सध्या एकाच राज्यात हा कायदा आणताना त्या राज्य सरकारांस इतक्यांना त्या कायद्याच्या कक्षेतून वगळावे लागले. देशपातळीवर हा कायदा आणायचा असेल तर आदिवासी ते पारशी अशा अनेकांना त्यातून सूट द्यावी लागेल. हे अनेक घटकांना 'वस्तू-सेवा करा'तून वगळण्यासारखेच. आदर्श 'जीएसटी' देशभर एक कर असतो आणि कोणत्याही घटकास वगळता येत नाही. हे सत्य लक्षात घेतल्यास आपल्या 'जीएसटी'स छिद्रे नाहीत; तर भगदाडे आहेत. त्याच वळणाने हा 'समान नागरी कायदा' जाणार. म्हणून तो दुसरा 'जीएसटी'.

# तुमच्या चुकांवर पांघरुण घालून माझं पांघरुण अन् पदर फाटून गेलाय

## बीडमध्ये अजित पवारांचं वक्तव्य



बीड, (प्रतिनिधी):-बीड जिल्ह्यात जेवढी नीट शिस्त लावू तेवढा तुमचा फायदा होईल. तुम्ही चुकीचे पायंडे बंद केले पाहिजेत तर उद्या उद्योगपती या भागात गुंतवणूक करतील. तुमच्याकडे पवनचक्की, सौरउर्जेचे काही प्रकल्प येत आहेत. या उद्योगपतींकडून खंडणी मागणाऱ्यांना आणि त्यांचा रस्ता अडवणाऱ्यांना माफ केले जाणार नाही. तीन ते चारपेक्षा अधिकवेळा गुन्हेगारी कृत्यात आढळून आल्यास संबंधितांवर मकोका लावला जाईल, असा इशारा अजित पवार (-क्षळीं झुरी) यांनी दिला. अजित पवार यांनी बीडच्या (इशशव छशु़ी) पालकमंत्रीपदाची धुरा स्वीकारल्यानंतर गुरुवारी ते पहिल्यांदा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीसाठी बीडमध्ये आले आहेत. या बैठकीपूर्वी अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात रोखठोख भाषण करताना पक्षात आणि बीड जिल्ह्यात गुन्हेगारी आणि चुकीची कृत्यं खपवून घेतली जाणार नाहीत, असा थेट इशारा दिला. तुम्ही निवडणुकीत किती पैसे खर्च करता मग आपल्या भागातील विकासकामांसाठी तशी भावना तुमच्या मनात का नाही? विकासकामे करताना आपल्या भागाबद्दल तुमच्या मनात आपलेपणा का नाही? आता सत्ता आल्यानंतर अनेक हौशे-गवशे येऊन मला भेटतात. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीला हे लोक दुसऱ्याच पक्षात होते. मात्र, आता येऊन सांगत आहेत की, दादा मी तुमच्यासोबतच आहे. हे असं चालणार नाही. मी काही दिवस तुमचं वागणं-बोलणं बघेन. प्रत्येक ठिकाणी सरड्यासारखे रंग बदलणारी जमात असते, ती माझ्या पक्षातही आहे. हे लोक उगवत्या सूर्याला नमस्कार करतात. पण आता तसलं चालणार नाही, हे मी सांगतो. उद्या परत कोणी माझ्याकडे आलं, एवढ्यावेळेला पांघरुण घाला, असे म्हणतील. पण माझं पांघरुण फाटून गेलंय. एवढ्यावेळेस तुम्हाला पदरात घेऊन आता माझा पदरच उरलेला नाही. त्यामुळे सर्व नेत्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना योग्यप्रकारे वागण्याच्या सूचना द्याव्यात. तुम्ही चांगलं वागलात तर मी तुमच्या पाठीशी पूर्ण ताकद उभी करेन. पण चुकीचे वागणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे अजित पवार यांनी सांगितले. बीड जिल्ह्यात विकासकामे करताना पंकजा मुंडे, धनंजय मुंडे यांच्यासोबत चर्चा केली जाईल. सगळ्यांनी स्वच्छ प्रतिमा ठेवा. लोकं बोलली पाहिजेत, हे लोक खरंच व्यवस्थित पद्धतीने काम करत आहेत. आपल्याला कोणाचा अवमान करायचा नाही. पण विकासकामे करताना फक्त पुढाऱ्यांना विचारुन होत नाही. तुम्ही दुटप्पी वागणार असाल तर मी काम करणार नाही. मी सरळमार्गी आहे, सगळ्यांना मदत करेन. आम्ही इकडे विटू-दांडू, गोट्या किंवा पतंग खेळायला आलेलो नाही, आम्ही इकडे काम करायला आलेलो आहोत, असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.

# जीबीएस आजाराचं थैमान सुरूच, साताऱ्यात आढळले चार रुग्ण

सातारा, (वृत्तसेवा):-पुण्यापाठोपाठ राज्याच्या इतर भागातही जीबीएस या दुर्मिळ आजाराचे रुग्ण सापडण्याचे प्रकार सुरुच आहे. पुणे,सोलापूर, नागपूर पाठापाठ आता सातारा येथे देखील जीबीएस सिंड्रोमचे चार रुग्ण सापडले आहेत.सातारा येथे १५ वर्षांच्या आतील ४ संशयित रुग्ण सापडले असून त्यांच्यावर सातारा येथील शासकीय रुग्णालयात दोन रुग्णांवर तर खाजगी रुग्णालयात एका तर कराडच्या कृष्णा रुग्णालयात एक अशा चार रुग्णांवर उपचार सुरु आहेत.चारही मुलांची प्रकृती व्यवस्थित असल्याची माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली आहे. या रुणाची चाचणी करण्यात आली असून प्रयोग शाळेत तपासणीनंतर जीबीएस आहे की नाही याचे निदान होणार आहे. जीबीएस आजाराच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिकेचा वैद्यकीय विभाग सतर्क झाला आहे.नाशिक महापालिकेच्या दोन रुग्णालयात विशेष कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. अतिदक्षतेचा उपाय म्हणून महापालिकेने या आजाराच्या संशयितांवर उपचार करण्यासाठी विशेष कक्षाची स्थापना केली आहे. नाशिक महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाचे डॉ.झाकीर हुसेन रुग्णालय आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ( बिटको ) रुग्णालयात विशेष कक्षाची स्थापना केली आहे. महापालिका हद्दीत खाजगी रुग्णालयात अशा पद्धतीचे रुग्ण आढळल्यास महापालिकेला कळवण्याचे आव्हान देखील मनपाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. तानाजी चव्हाण यांनी केले आहे . ऋइड आजाराच्या बाबत सगळ्या यंत्रणा आपापल्या ठिकाणी काम करत आहेत. ऋइड आजाराचा पुण्याच्या सिंहगड रोड भागात जास्त प्रादुर्भाव आहे. रुग्णांना दिलासा देण्याचे काम प्रशासन करत आहे. ऋइड वाढणार नाही यासाठी यंत्रणा प्रयत्न करत आहे. केंद्रीय पथकाने काही ठिकाणी भेटी दिल्या आहेत असे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# मॉडेल स्कूलच्या वतीने क्रीडा दिवस महोत्सव जल्लोषात साजरा



बीड, (प्रतिनिधी):- प्रजासत्ताक दिनानिमित्त मॉडेल स्कूलच्या वतीने विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी क्रीडा दिवस महोत्सव साजरा करण्यात आला. ज्यात प्रमुख पाहुणे म्हणून अजित पवार गटाचे युवा नेतृत्व डॉ.योगेश भैया क्षीरसागर तर अध्यक्ष अन् उद्घाटक म्हणून प्रसिद्ध बालचिकित्सक डॉ. संजय जाणवळे व यनआयसीयु सिव्हिल हॉस्पिटचे मुख्य डॉ. इलियास खान हे उपस्थित होते. सफदर आली देशमुख वेल्फेअर ट्रस्ट चे सचिव सुजात आली देशमुख व संस्थेच्या प्राचार्या प्रिया मॅम यांच्या अथक परिश्रमाने क्रीडा दिवस महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या खेळात सहभाग घेऊन आपल्या कलेला दुजोरा दिला. ज्यात खो खो, कब्बडी, क्रिकेट , फुटबॉल, तसेच रस्सीखेच व रनिंग सारख्या खेळात उत्साहाने भाग घेतला. संस्थेत आलेल्या प्रमुख पाहुण्याच्या समोर मुख्यतः संगीत पिटी, लेझिम, कराटे थीम, व पिरॅमिड थीम दाखवून विद्यार्थी पालकांच्या अन् पाहुण्यांच्या कौतुकाचा विषय ठरले. या क्रीडा दिवसाला यशस्वी करण्यासाठी क्रीडा शिक्षक घोलप सर यांच्या सोबत संस्थेतील सर्वच शिक्षकांनी अथक परिश्रम घेतले. आपल्या मनोगतात बोलतांना डॉ. योगेश भैया क्षीरसागर म्हणाले, की शिक्षण अन् क्रीडा हे विद्यार्थ्यांच्या यशाचे शस्त्र आहे, आणि त्यांचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी सफदर आली वेलफेअर संस्था प्रतिबद्ध आहे. आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. जाणवळे सर यांनी विद्यार्थ्यांना संपुष्ट आहार अन् आरोग्याची काळजी कशी घ्यावी यासाठी महत्त्वाच्या सूचना दील्या. निरोगी माणसाच्या आयुष्यात माणसाने नित्याने व्यायाम करावा यासाठी डॉ. इलियास सरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. क्रीडा दिवस साजरा करायला यावेळी आपल्या पाल्यासमवेत शेकडो पालक उपस्थित होते. क्रीडा दिवस महोत्सवात मुख्यतः पालकांसाठी ही रस्सीखेच हा खेळ घेण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव, प्राचार्य, सर्वशिक्षक उपस्थितीत होते.

पान १ वरून

### मनोज जरांगेंचं...

✻ मनोज जरांगेंनी काय म्हटलं? : काही लोक म्हणत आहेत की मनोज जरागेंच्या उपोषणातून काय मिळाल? पण त्यांचा २४ तास एकच धंदा आहे, त्यांना काही करायचं नाही. राज्य सरकारकडून शिंदे समिती पूर्णपणे बंद करण्यात आली होती. शिंदे समितीच्या मंत्रालयावरील ऑफिसला कुलूप लावण्यात आलं होतं, जे काय मिळालं म्हणत होते ना? घरात बसून नेत्यांचे पाय चाटणाऱ्यांना काय मिळालं ते कळणार नाही, असा टोला काही मराठा समन्वयकांना जरांगे पाटील यांनी लगावला. आता शिंदे समिती राज्यात काम करणार आहे, पूर्ण राज्य आमचं आहे. पण, बीड आणि धाराशिव जिल्ह्यात काही अधिकारी जातीयवादी आहेत, ते मराठा समाजातील तरुणांना प्रमाणपत्र देत नाहीत, त्यांना बडतर्फ केलेलंच बरं असंही जरांगेंनी म्हटलं आहे.

### सकारात्मक राहून...

यावेळी आज झालेल्या या बैठकीस व्यासपीठावर अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, तसेच खा. रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे, बीडचे पालक सचिव तथा आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे तसेच जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने,पोलिस अधिक्षक नवनित कॉवत व सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे यांची उपस्थिती होती. नियोजन समिती सदस्यामध्ये आमदार सर्वश्री सतीश चव्हाण, विक्रम काळे, सुरेश धस, प्रकाश सोळंके, नमिता मुंदडा, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित. बीडमध्ये गुंतवणूकदार येण्यासाठी वातावरण बदलणे आवश्यक आहे या भूमिकेतून काम करा गुंतवणूक येण्यासाठीआवश्यक अशी मुंबई ते बीड थेट रेल्वे सुरू करण्यासोबतच येणाऱ्या काळात बीड साठी विमानतळ देण्याबाबतही सकारात्मक असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. राज्यातील यापुढील सर्व जिल्ह्यांचा उर्वरित निधी आढाव्यानंतर मोकळा करू त्यामुळे सर्वांनी आताच कामाला लागावे असेही ते म्हणाले. नगरपालिका तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांनी आधी शहर स्वच्छ ठेवण्याकडे लक्ष द्यावे पुढील भेटीत मला संपूर्ण शहर स्वच्छ दिसले पाहिजे असेही श्री पवार यांनी सांगितले. आज या बैठकीपूर्वी त्यांनी जिल्हयातील सर्व विभागप्रमुखांकडून विविध कामांचा आढावा घेतला व सर्वांनी चांगले काम करावे अशा सूचना देताना कामात दिरंगाई करणाऱ्यांवर थेट कारवाईचा इशाराही दिला. नियोजन समितीच्या बैठकीत यावेळी प्रशासनातर्फे सर्वांचे स्वागत संविधान देऊन यावेळी करण्यात आले. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी यावेळी आढाव्याचे सादरीकरण केले. आरंभी सर्वांच्या उपस्थितीत निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता संख्याज्ञान विषयक मिशन जरेवाडी या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले.आज ३० जानेवारी हुतात्मा दिन असल्याने बरोबर ११.०० वाजता सर्वांनी २ मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांना अभिवादन या सभेदरम्यान केले.सभेच्या यशस्वितेसाठी जिल्हा नियोजन अधिकारी, डॉ. सुधिर चिंचाणे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच नियोजन विभागाचे इघारे आणि इतरांनी परिश्रम घेतले.

### आ.संदीप क्षीरसागरांकडून...

ती विद्युत विभागाला द्यायची आणि त्यांच्याकडून आपणास हवा असणारा विद्युत पुरवठा घ्यायचा. तसेच ३६ कोटी रुपये थकबाकी भरण्यास मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी तत्वतः मंजूरी दिली आहे. त्याबाबत मा.दादांचे आभार व्यक्त केले. ✻ बीड शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतःळ्याची उंची वाढवणे याबाबतीत तात्काळ पुढील कार्यवाही बाबत संबंधितास आदेशीत व्हावे. ✻ अल्पसंख्यांक मुलींच्या वस्तीगृह मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असून बीड शहरात उपलब्ध असलेल्या शासकीय आवारामध्ये सहन जागा उपलब्ध करून देणे. ✻ जिल्हा नियोजन अंतर्गत बीड नगर परिषदेला नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत १० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध व्हावा. ✻ बीड नगर परिषद हद्दीतील सिटी सर्व्हे नं.७४५४ मधील जुने तहसील कार्यालय जागेत दुकान केंद्रासाठी व उर्दु घरासाठी बीड नगर परिषदेकडे हस्तांतरण व तसेच सुभाष रोड येथील जनावरांचा दवाखानाची जागा नगर परिषद, बीडला हस्तांतरण करणेसाठी बैठकीचे आयोजन बाबत संबंधितास आदेश व्हावे असे झाल्या नगर परिषद, बीडच्या स्वउत्पन्नामध्ये वाढ होईल. ✻ बीड येथील जनावरांचा दवाखाना, सुभाष रोड येथील जागा नगर परिषद, बीड ला हस्तांतरण करणेसाठी बैठकीचे आयोजन करणे. ✻ बीड नगर परिषद हद्दीतील जुने तहसील कार्यालय जागेत दुकान केंद्रासाठी व उर्दू घरासाठी बीड नगर परिषदेकडे हस्तांतरण करणेबाबत ✻ सन २०२० चा रखडलेला पीक विमा राज्य तक्रार समितीने डिसेंबर २०२२ मध्ये बीड,वडवणी,गेवराई तालुक्यातील शेतकर्यांच्या खात्यात जमा करण्याचे सांगितले होते. मात्र एक वर्ष उलटले तरी अद्याप तरी अंमलबजावणी झाली नाही. ✻ महाडीबीटी अंतर्गत लाभार्थी असलेल्या विविध योजनेतील लाभार्थ्यांना अद्यापपर्यंत अनुदान मिळालेले नाही. या बाबत विभागाकडून निधी उपलब्ध नसल्याचे सांगितले आहे. ✻ श्री क्षेत्र कपिलधार १०० कोटी रूपयांचा विकास आराखडा मंजुर असून त्यास मान्यता देण्यात यावी. ✻ शिवणी ता.बीड येथील महाविहार धम्मभुमी बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण केंद्रास 'क' दर्जा तीर्थक्षेत्र दर्जा देण्यात यावा. ✻ श्री क्षेत्र उजव्या सोंडीचा गणपती मंदिर देवस्थान मन्यारवाडी, श्री क्षेत्र बेलखंडेश्वर महादेव संस्थान बेलखंडी पाटोदा ता.जि.बीड या तिर्थक्षेत्रास 'क' दर्जा प्राप्त करण्यात यावा. ✻ खंडेश्वरी मंदिरासमोरील तालुका क्रीडा संकुलासाठी आपल्या विभागाकडून ५ कोटी रूपयांच्या विविध क्रीडा सुविधा निर्मितीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी १ कोटी रूपयांच्या निधी प्राप्त असून उर्वरित ४ कोटी रूपयांच्या विकास कामांचा आराखडा सादर केलेला असून त्या निधी उपलब्ध होणे बाबत. ✻ बीड जिल्हा संकुलाची निर्मिती व सर्व क्रीडा सुविधांचे काम २५ वर्षापुर्वी झालेले आहे. सदर क्रीडा संकुलासाठी ८ कोटी रूपयांची तरतुद झालेली आहे. संकुलाची इमारत दुरूस्तीचे व क्रीडा सुविधांच्या दुरूस्तीचे काम करणे गरजेचे असून नवीन क्रीडा संकुलाच्या निर्मितीप्रमाणे संकुल व क्रीडा सुविधांच्या दुरूस्तीसाठी विशेष बाब अंतर्गत १७ कोटी रूपयांची तरतुद करण्यात यावी. ✻ बोरफडी, मौज, जेबापिंप्री दगडी शहाजानपुर, मन्यारवाडी, मांजरसुंबा ता.बीड येथील उपकेंद्र इमारत बांधकामास निधी उपलब्ध करून देण्यात यावा. ✻ बीड शहरातील अंकुशनगर उपकेंद्रावरून अर्ध्यापेक्षा जास्त बीड शहराला वीज पुरवठा आहे. सर्व सरकारी कार्यालय व वाढीव वस्त्या सदर उपकेंद्रावर असून ओव्हरलोड होत असून नवीन अतिरिक्त उपकेंद्र पोलीस कॉलनी येथे झाल्यास सोयीस्कर होईल व लाईटची अडचण मार्गी लागेल. ✻ बीड जिल्हा वसुलीमध्ये एक नंबर असून शहरातील दुरुस्तीच्या कामांना निधी उपलब्ध व्हावा. ✻ डीपीडीसीमध्ये बीड तालुक्यातील एकही प्रस्ताव मंजुर झालेला नाही. ✻ ऋगावठाण अंतर्गत वस्ती येथील डी.पी.देणे बाबत नियम व अटी शिथील करण्यात यावे. ✻ बीड शहर अंतर्गत जुने पोल बदलणे व केबलद्वारे काम करणेसाठी आदेशीत व्हावे. ✻ पाली येथील ३३ के.व्ही.चे काम सुरू करणे बाबत आदेशीत व्हावे. ✻ निवारणबीड व शिरूर का.तालुक्यातील कृषी व सिंगल फेज डी.पी.देण्यात यावे. ✻ ताडसोन्ना, लिंबारुई, चर्हाटा, आहेरधानोर, बोरखेड, मोरगाव ता.बीड येथे वीजवितरण उपकेंद्र करण्यासाठी मंजुरीसह देण्यात यावा. ✻ बीड व शिरूर कासार तालुक्यात शाळा खोली बांधकाम, दुरूस्ती आणि कंपाऊंड वॉल बांधकाम करणे. ✻ बीड १ व २ ,बीड नागरी,शिरूर कासार येथील प्रकल्पातील व प्रकल्पांतर्गत अंगणवाडीतील रिक्तपदे भरणे. ✻ युवा शांतीवन पाली येथील उर्वरित कामे करणेसाठी निधी उपलब्ध करण्यात यावा. ✻ देवराई येथील आराखडा तयार करून कामे करणेसाठी निधी उपलब्ध होणे बाबत. ✻ शिरूर तालुक्यातील हिवरसिंगा, जवळागिरी, बरगवाडी या गावातील वाहतुकीसाठी रेल्वे ब्रिज नसल्यामुळे गावात नागरिकांना ये-जा करण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे. याबाबत रेल्वे विभागाकडे प्रस्ताव सादर करून या प्रकरणी तोडगा काढण्यासाठी विनंती केली.

### जिल्हा नियोजन...

महाराष्ट्रात सर्वात आघाडीवर आहे, हेही धनंजय मुंडे यांनी नमूद केले. बीड जिल्हा पोलिस दलास आवश्यक ७३ नवीन वाहने, ११३ मोटार सायकल या बाबी नियोजन समितीच्या माध्यमातून देण्यात आल्या. अशी अनेक सकारात्मक कामे करताना सर्व तालुक्यांना समान निधी देण्याचीही पुरेपूर काळजी घेण्यात आली, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. यावेळी ऐकीव आणि अर्धवट माहितीच्या आधारे नियोजन समितीच्या कामकाजावर मागील काही दिवसात करण्यात आलेल्या निराधार आरोपांना देखील धनंजय मुंडे यांनी चोख प्रत्युत्तर दिले. ✻ बीड जिल्हा सलोखा आणि बदनामी : दरम्यान बीड जिल्ह्यात मागील काही महिन्यांपासून जातीयवादाचे विष काही लोकांकडून जाणीवपूर्वक पेरले जात आहे. याचा परिणाम जनतेपासून ते अगदी प्रशासनावर सुध्दा झालेला दिसून येत असून, जिल्हा प्रशासनात सुध्दा उभी फूट पडली आहे, हे नाकारता येणार नाही. कोण कधी कुठल्या अधिकाऱ्याचे नाव आणि जात काढून काय आरोप करतील ते सांगता येत नाही, त्यामुळे शिपाई ते जिल्हाधिकारी सर्वच अधिकारी - कर्मचारी यांच्यावरती भीती व दडपणाचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत आपल्या पदांना व कामांना हे अधिकारी कसा न्याय देऊ शकतील, असा प्रश्न उपस्थित करत धनंजय मुंडे यांनी अधिकारी कर्मचारी यांची एक विशिष्ट रणनीती ठरवून त्यांना भयमुक्त वातावरण तयार करून देण्याबाबत तात्काळ ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचे स्पष्ट मत व्यक्त केले. दरम्यान काही अफवा पसरवून, अर्धवट माहितीच्या आधारे मीडिया ट्रायल चालवून बीड जिल्ह्याची नको ती प्रतिमा बाहेर प्रसिद्ध केली जात असून, सबंध जिल्ह्याची नाहक बदनामी होत आहे. सामाजिक सलोखा अबाधित रहावा तसेच जिल्ह्याची बदनामी थांबावी, याबाबतही ठोस उपाययोजना करण्याची मागणी धनंजय मुंडे यांनी अजितदादा यांच्याकडे केली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# धनंजय मुंडे श्री क्षेत्र भगवानगडावर नतमस्तक



## निवडणुकीनंतर प्रथमच गडावर, येथे आल्याने लढायची शक्ती आणि कामाची ऊर्जा मिळते - धनंजय मुंडे ; महंत डॉ. नामदेव शास्त्री व मुंडेंची उशिरापर्यंत चर्चा

**पाथर्डी/भगवानगड । प्रतिनिधी**

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे हे आज बीड येथील जिल्हा नियोजन समितीची बैठक संपल्यानंतर थेट श्री क्षेत्र भगवानगड येथे मुक्कामी गेले आहेत. धनंजय मुंडे यांनी संत भगवानबाबा यांच्या समाधीचे दर्शन घेऊन वंदन केले. गडाचे द्वितीय महंत ह.भ.प. भिमसिंह महाराज यांच्याही समाधीस्थळी श्री मुंडे नतमस्तक झाले.

विधानसभा निवडणुकीनंतर प्रथमच गडावर आलो असून, संत भगवानबाबा यांचा मी एक निस्सीम भक्त आहे. या स्थळी नतमस्तक होऊन मला लढायची शक्ती आणि लोकांची कामे करण्यासाठी ऊर्जा मिळते, आज या ठिकाणी मुक्कामी राहणार असून, गडाचा प्रसाद ही घेणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. धनंजय मुंडे यांनी यावेळी गडाचे महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री यांचे दर्शन व आशीर्वाद घेऊन गडावरील संत ज्ञानेश्वर मंदिर, शिक्षण संस्था, वारकरी शिक्षण संस्था आदींची महंतांच्या सोबतीने पाहणी केली. गडाच्या परिसरातील भाविकांनी यावेळी धनंजय मुंडे यांचे स्वागत केले. यावेळी परिसरातील असंख्य महिला व पुरुष भाविक उपस्थित होते. दरम्यान भगवान गडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री व धनंजय मुंडे यांची उशिरापर्यंत चर्चा सुरू होती. श्री क्षेत्र भगवानगड या तीर्थक्षेत्राचे राज्याच्या अध्यात्मिक, सामाजिक त्याचबरोबर राजकीय क्षेत्रात देखील अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी देखील श्री क्षेत्र भगवानगड येथे दर्शन घेऊन गडाने सुरू केलेल्या पहिल्या शिक्षण संस्थेची पायाभरणी वै. संत भगवानबाबा यांच्या उपस्थितीत त्यांच्या स्वहस्ते केली होती.

# अजितदादा बीडची बारामती करा;शिक्षणाच्या पायाभूत सुविधांसाठी ज्ञानमंदिरांना भरीव निधी द्या

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

अजितदादा बीडची बारामती करा, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षणाच्या पायाभूत सुविधांसाठी ज्ञानमंदिरांना निधी द्या.बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरावस्था असुन ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या आहेत तर ४६८ शाळांमधील ८५६ वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक आहे तसेच जिल्हा परिषदेच्या ईमारत नसलेल्या ६३ वस्तिशाळांना ईमारत निधी, १३९२ शाळांमध्ये वीजपुरवठा खंडित असल्याने विद्यार्थ्यांचे डिजिटल शैक्षणिक नुकसान होत आहे.तसेच जिल्हा परिषदेच्या ३१७ शाळांमध्ये स्वच्छतागृहांचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक कुचंबणा होत आहे त्यामुळे दुरावस्थेत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्यात भरीव निधी देण्यात यावा यासाठी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज दि.३० गुरुवार रोजी धरणे आंदोलन करण्यात येऊन ना.अजितजी पवार, ना. धनंजय मुंडे, ना.पंकजाताई मुंडे , आ. प्रकाशदादा सोळंके, आ.सुरेश धस, आ. विजयसिंह पंडित, आ.संदिप क्षीरसागर, आ.नमिता मुंदडा, यांना निवेदन देण्यात आले आहे.आंदोलनात शेख युनुस,राम नाथ खोड, सुदाम तांदळे ,शिवशम शेलार, शेख मुस्ताक,पांडुरंग हराळे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक राम धन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष आप माजी सैनिक अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना नितीन सोनवणे, शहराध्यक्ष राजेश वडमारे आदी सहभागी होते.









*बीड जिल्ह्यातील नावलौकिक अशा शैक्षणिक क्षेत्रातील द.बा. घुमरे पब्लिक स्कूल, आयकॉन इंग्लिश स्कूल येथे आज रोजी ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना संबोधित करताना ड.गोविंद शिराळे यावेळी उपस्थित आदरणीय संस्थेचे अध्यक्ष मुख्याध्यापक दीपक जी घुमरे सर ,आयकॉन इंग्लिश च्या प्रिन्सिपल रिंकी गोयल -अग्रवाल मॅडम सर्व शिक्षक वृंद कर्मचारी ,विद्यार्थी -विद्यार्थिनी व पालक यावेळी उपस्थित होते.*

# प्रजासत्ताक दिन साजरा



**केज । प्रतिनिधी**

माऊली विद्यापीठ केज संचलित सरस्वती महाविद्यालय, भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय, महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा भारतीय ७६ वा प्रजासत्ताक दिनी माऊली विद्यापीठ संस्थेच्या सदस्या सौ. देविकाताई पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करून तिरंगा ध्वजास मानवंदना देण्यात आली. सरस्वती महाविद्यालय केज, भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय व भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी माऊली विद्यापीठ केजचे सचिव मा. अजित्यदादा पाटील, ॲड. अमितभैया पाटील, सौ अनन्या पाटील, प्रवीणभाऊ शेप, प्रशासकीय अधिकारी प्रतापजी मोरे,विश्वजित पाटील,मनोज पाटील, प्राचार्य डॉ. गौतम पाटील, विजयकुमार शिनगारे ,डॉ.हनुमंत सौदागर, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# चिंचोटी जि. प. प्राथमीक शाळेत प्रजासत्ताक दिन उत्सहात साजरा

## ४ वर्षीय चिमुकली समृद्धी फपाळ ने सर्वांची मने जिंकली

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील चिंचोटी जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. यामध्ये विविध सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी इंग्रजी मराठी हिंदी मध्ये व प्रजासत्ताक दिन विशेष महापुरुषां बदल जबरदस्त भाषणा केले. विद्यार्यांनी मराठी हिंदी गाण्यावर जबरदस्त नृत्य सादर केले.यामध्ये गावातील अंगणवाडी मध्ये शिक्षण घेणाऱ्या कु. समृद्धी अशोक फपाळ या चार वर्षाच्या चिमुकली ने खूप सुंदर नृत्य सादर केल्याने तिच्यावर सर्वांनी कौतुकाचा वर्षाव केला. सर्व विद्यार्थ्यांना दोस्ती ग्रुप व स्व स्वाती गोंडे हिच्या स्मरणार्थ वडील शेषनारायन गोंडे यांच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील चिंचोटी जिल्हा परीषद प्राथमिक शाळेत दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी प्रजासत्ताक दिना निमित्त विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणुन शाळेत विविध सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये देश भक्ती गिताबरोबर मराठी हिंदी गाण्यवर विर्द्यार्थ्यांनी जबरदस्त नृत्य सादर केले.यामध्ये पहिली चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले माऊली माऊली रूप तुझे.इयत्ता दुसरी - टप टप पडती प्राजक्ता ची फुले.इयत्ता तिसरी - फिर भी दिल है हिंदुस्तानी.इयत्ता चौथी-लाल्लाती भंडार-जलवा जलवा. इयत्ता पाचवी ते सातवी च्या मुली- बरसो रे मेघा मेघा

इयत्ता पाचवी ते सातवी च-राज आलं राज आलं. सातवीच्या विद्यार्थीनींनी बरसी रे मेघा मेघा व अंगणवाडी शाळे मधील चिमुकली समृद्धी आशोक फपाळ - आम्ही शिवकन्या या गाण्यावर हातात भगवा ध्वज घेऊन सुंदर नृत्य सादर केल्याने समृद्धी व सर्व विद्यार्थ्यांच्या कलेला दाद देत प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटासह बक्षीसांचा वर्षाव केला. विद्यार्थ्यांची चांगली तयारी करुन घेतल्या बदल सर्व गावकर्यांनी शिक्षकांचे व समृद्धीचे आई वडील यांचे अभार मानले.




# दमानिया ताई आपण थोडे चुकलातच, आपण सत्याच्या बाजूने राहू, अपप्रवृत्तींन आपण ठेचून काढू

**डॉ. अशोक थोरात हे सिविल सर्जन होण्यापूर्वी केज उपजिल्हा रुग्णालय येथे वैद्यकीय अधीक्षक होते .त्याही वेळेला त्यांनी केलेल्या कामाची शासनाने दखल घेऊन त्यांना देश पातळीवर पुरस्कृत केलेले आहे, तोच पॅटर्न पुढे ठेवून त्यांनी बीड जिल्ह्याच्या सिव्हिल सर्जन पदाचा भार स्वीकारला ,तोही ऐन कोविड काळात, ज्या वेळेला घरचे नातेवाईक पेशंट जवळ जात नव्हते त्यावेळेला हे सद्ग्रहस्थ पूर्ण जिल्ह्याचे कोविड पेशंटचे उपचाराचे नियोजन स्वत: समोर उभा टाकून सांभाळत होते .**

संपूर्ण जिल्ह्यामध्ये विविध उपजिल्हा रुग्णालय व तालुका रुग्णालय मध्ये स्वतः जाऊन गोरगरीब रुग्णांच्या पोटाच्या शस्त्रक्रिया दुर्बिणीच्या साह्याने डॉ. अशोक थोरात करत असतात, त्याही न कंटाळता आष्टी पासून परळीपर्यंत. डॉ. अशोक थोरात यांचा फोन २४ तास चालू असतो. गरजू रुग्णांसाठी ते कायम एका पायावर मदत करण्यासाठी तयार असतात. ते नाशिक येथे सिविल सर्जन असताना बीड जिल्ह्यातले अनेक रुग्ण शस्त्रक्रियेसाठी नाशिकला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. सिव्हिल सर्जन होण्यापूर्वी डॉ अशोक थोरात व त्यांच्या सौभाग्यवती सौ डॉ प्रतिभा थोरात, ज्या स्वतः रेडिओलॉजिस्ट आहेत यांचे श्रेया हॉस्पिटल या नावाने केज येथे स्वतःचे प्रायव्हेट हॉस्पिटल पण होते जे त्यांनी सिव्हिल सर्जन झाल्यानंतर बंद केले. अशा व्यक्तिमत्त्वांनी मागच्या तीस वर्षात अहोरात्र मेहनत करून जनतेची सेवा केली त्याबरोबरच एखादे हॉटेल काढले तर त्याची चौकशी करण्याच्या आग्रह कशासाठी ?

स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, परंतु त्यातील एखादा गुन्हेगार पोट दुखतोय म्हणत असेल तर त्याला उपचार देणे हा कसा काय गुन्हा होईल आणि हे उपचार सुद्धा डॉक्टर अशोक थोरात स्वतः परदेशामध्ये पूर्वनियोजित पर्यटन दौऱ्यामध्ये असताना बीड जिल्हा रुग्णालयातील त्यांचा पदभार दिलेल्या डॉक्टरांनी एखाद्याला ॲडमिट करण्याचा निर्णय घेतला असेल तर डॉक्टर अशोक थोरात कसे काय जबाबदार? स्वर्गीय संतोष देशमुख यांचे पोस्टमार्टम वास्तविक पाहता केजच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केलेले आहे परंतु मसाजोग कर ग्रामस्थांच्या आग्रहामुळे डॉक्टर अशोक थोरात पोस्टमार्टम दरम्यान उपस्थित राहिले. अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याला टारगेट करून आपण आरोप केलेला फार चुकीचा आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष भैय्या देशमुख यांची झालेली हत्या ही अतिशय निंदनीय आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना आहे. घटनेतील जे कोणी आरोपी आहेत त्यांना निश्चितपणे शिक्षा ही झालीच पाहिजे. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेने संपूर्ण बीड जिल्ह्याची देशभरात एका वेगळ्या अर्थाने चर्चा होते आहे. या घटनेतील सूक्ष्मातील सूक्ष्म आरोपीला शोधून त्यांना कडक शिक्षा व्हायला हवी या मताचे आपण सर्वजण आहोत. कुठल्याही घटनेतील आरोपीला जात, धर्म, पंथ असे काही नसते. वाईट प्रवृत्ती ही वाईटच असते आणि अशा प्रवृत्तीला ठेसून काढले पाहिजे. या घटनेच्या अनुषंगाने अनेकांनी आपला आवाज उठवला आणि उठवत आहेत. न्यायाच्या बाजूने लढणाऱ्या प्रत्येकाचे समर्थन आणि अभिनंदन हे केलेच पाहिजे. मात्र निर्माण झालेल्या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन काही स्वयंघोषित समाजसेवक चुकीची माहिती पसरवून बीड जिल्ह्याच्या मातीला बदनाम करण्याचे आणि येथील सामाजिक एकोपा बिघडवण्याचे काम करू पाहत आहेत. उठसूठ कोणावरही आरोप करायचा, चुकीची आणि





बिनबुडाची माहिती पसरवण्याचा जणू ठेकाच उचलला आहे. कुठलाही आधार नसतांना त्या जे बोलत आहेत त्यामुळे संतोष भैय्या देशमुख यांना न्याय मिळायचा सोडून हे प्रकरण विनाकारण नको नको त्या दिशेला जात आहे. त्यांनी मागील दोन दिवसांपासून बीड जिल्ह्याचे शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्यावर बिनबुडाचे, तथ्यहीन आरोप करण्याचा सपाटा लावलेला आहे. वास्तविक पाहता अंजली दमानिया ताईंना पुरेशी माहिती नाही किंवा त्यांच्याकडे असलेल्या अर्धवट माहितीमुळे गैरसमज पसरत आहेत म्हणून हे मी लिहीत आहे. डॉ.अशोक थोरात हे बीड जिल्ह्यात मागील ३० वर्षांपासून आपली सेवा बजावत आहेत. सरपंच संतोष भैय्या देशमुख यांची हत्या झाल्यानंतर त्यांनी तयार केलेला शवविच्छेदन अहवाल हा वस्तुनिष्ठ आणि वास्तवदर्शी दिल्याने या प्रकरणाला योग्य दिशा मिळाली आणि पोलीस तपासात खूप मोठी मदत झाली. मात्र अहवालावर चुकीचे आरोप होत आहेत. डॉ.थोरात यांच्या कार्यामुळे या जिल्ह्याचा मागील काळात वाढलेला लौकिक त्यांना खुपत असावा. त्यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल केंद्रीय आरोग्य मंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार मिळालेला आहे हे त्या कदाचित विसरत आहेत. आजही ते सेवेत असताना जिल्ह्यातील प्रत्येक उपजिल्हा रुग्णालयात जाऊन शस्त्रक्रिया करतात, त्यांच्या धोरणात्मक निर्णयांमुळे आणि रचनात्मक कार्यामुळे मुलींचा जिल्ह्यातील जन्मदर मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. जिल्ह्यात त्यांनी अनेक महा आरोग्य शिबिरे भरवली ज्यामुळे लाखो रुग्णांना त्याचा लाभ मिळाला. मुंबई, पुणे सारख्या मोठ्या शहरात मिळणाऱ्या वैद्यकीय सेवा जिल्ह्यात असाव्यात यासाठी त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. कोरोना सारख्या अतिशय खडतर काळात रुग्णांसाठी त्यांनी रात्रीचा दिवस करून रुग्णांचे प्राण वाचवले, त्यांना धीर दिला आणि परिस्थितीला सावरले.

डॉ.अशोक थोरात यांच्या कार्यकाळात अनेक प्लास्टिक सर्जरी शिबिरे घेण्यात आल्याने अकाली आलेल्या अपंगत्वावर अनेकांना मात करता आली. हजारो रुग्णांना सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून त्यांनी कृत्रिम हात व पाय मिळवून दिले. जिल्हा शल्यचिकित्सक पदाची सूत्रे हाती घेण्याच्या अगोदर शासकीय दवाखान्यात फक्त ४५% प्रसूती होत असायच्या. लोकांचा ओढा खाजगी दवाखान्यांमध्ये जाण्याकडे असायचा. मात्र त्यांच्या कार्यकाळात शासकीय वैद्यकीय सेवेची विश्वासार्हता वाढली आणि मोठ्या प्रमाणावर प्रसूती शासकीय दवाखान्यात होऊ लागल्या आहेत. त्यांच्या कार्यकाळात करण्यात आलेल्या जनजागृतीमुळे जिल्ह्यात मुलींचा जन्म दर मोठ्या प्रमाणावर वाढला. अवघड आणि गुंतागुंतीचे उपचार घेण्यासाठी मोठ्या शहरात जाणाऱ्या रुग्णांची संख्याही मोठी होती, डॉ. थोरातांच्या काळात ही संख्या शून्याकडे वाटचाल करीत असल्याचे आपल्याला दिसेल. खाजगी आणि शासकीय सेवा देणाऱ्या सर्वांचा त्यांनी उत्तम समन्वय घडवून आणत जिल्ह्याला एका उंचीवर नेऊन ठेवले. अशी अनेक विधायक कामे त्यांनी जिल्ह्यात केलेली आहेत. येथील वैद्यकीय क्षेत्राला नवी दिशा देण्यासाठी ते प्रचंड मेहनत घेतात. त्यांनी केलेल्या कामांकडे डोळेझाक करताच येणार नाही. अंजली दमानिया यांच्यासारख्यानी एक लक्षात घ्यावे की इथली माती ही संत महंतांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेली आणि अनेक महापुरुषांच्या विचाराने प्रेरित झालेली माती आहे. न्यायाच्या बाजूने लढणाऱ्या सर्वांच्या बाजूने आम्ही ठाम राहू मात्र चुकीचे आणि अर्धवट सत्य आपल्यापर्यंत पुरवणाऱ्या व्यक्तीची डॉक्टर थोरात यांच्यावर आरोप करण्यापूर्वी शहानिशा करणे गरजेचे होते आणि डॉ थोरात यांच्यावर आरोप करणायाआगोदर जिल्ह्यातील सर्व जाती धर्माच्या सामान्य लोकांना त्यांच्याविषयी किंवा संतोष देशमुख यांच्या गावातील लोकांकडून डॉक्टर थोरात यांच्या विषयीं माहिती घेऊनच मग पुढे स्टेटमेंट द्यायला हवे होते त्यामुळे दमानिया ताई तुम्ही चुकलातच आपल्या स्टेटमेंट मुळे जिल्ह्यातील सर्व जाती-धर्माच्या लोकांमध्ये आपली दिशा चुकलेलीच दिसून येत आहे असे दिसून येत आहे .

## ५०% पेक्षा अधिक नोंदणीकृत शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी बाकी, १५ दिवसांची मुदतवाढ मिळावी : संचालक धनंजय गुंदेकर

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ५० टक्के नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची अद्याप सोयाबीन खरेदी झालेली नाही. बीड तालुक्यातील नाळवंडी, चौसाळा, पिंपळनेर भागातील शेतकऱ्यांची अद्याप सोयाबीन विक्री करण्यात आलेली नाही. बीड तालुक्यात सुरू असलेल्या दोन्ही सेंटरवर सध्या सायोबीन विक्रीसाठी वाहनांच्या रांगा लागलेल्या आहेत. आणि बहुतांश शेतकरी सध्या आपला नंबर यायच्या प्रतिक्षेत आहेत. मध्यंतरी १५ दिवसांपेक्षा अधिक काळ बारदाण्याच्या अभावी खरेदी थांबलेली होती. यासोबतच वेळोवेळी तांत्रिक अडचणीमुळे खरेदी केंद्रे बंद राहिलेली आहेत. मात्र आज दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी खरेदीची शेवटची तारीख आहे. ज्या शेतकऱ्यांची खरेदी होणार नाही. त्या शेतकऱ्यांना चालू बाजार भावानुसार खाजगी व्यापाऱ्यांना आपली सोयाबीन विक्री करावी लागेल. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे. ते वाचविण्यासाठी व शेतकऱ्यांना हमीभावानचे सोयाबीन विक्री करता यावी यासाठी जिल्हा पणन अधिकारी यांनी वरिष्ठांसोबत या गंभीर परिस्थितीबाबत चर्चा करुन किमान १५ दिवसांचा खरेदीसाठी वेळ वाढवून घ्यावा अशी मागणी संचालक धनंजय गुंदेकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार दिंडीचे माजलगाव शहरात ३ फेब्रुवारीला होणार आगमन

**माजलगाव । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त महाराष्ट्र राज्य पतसंस्था व मल्टीस्टेट फेडरेशन च्या वतीने महाराष्ट्रभर स्व. धनंजयराव गाडगीळ सहकार दिंडीचे आयोजन होत असून माजलगाव शहरामध्ये सदरील दिंडीचे आगमन दिनांक ०३ फेब्रु २०२५ रोजी होत आहे. सदरील दिंडी प्रस्थान दुपारी ठीक ३.०० वाजता संभाजी चौक येथून होणार असून शिवाजी चौक,आंबेडकर चौक,मोंढा मार्गे वैष्णवी मंगल कार्यालय याठिकाणी सायंकाळी ७.०० वाजता थांबणार असून त्या ठिकाणी सहकार मेळावा होणार आहे.सदरील मेळाव्यामध्ये महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशन चे अध्यक्ष श्री काका साहेब कोयटे व मल्टीस्टेट फेडरेशन चे अध्यक्ष श्री सुरेशजी वाबळे साहेब सदरील दिंडी करीता उपस्थित राहुन सहकार क्षेत्रातील सर्व घटकांना मार्गदर्शन करणार आहेत. सहकार चळवळीस बळकटी निर्माण होऊन गती प्राप्त व्हावी करीता माजलगाव शहर व परिसरातील पतसंस्था,मल्टीस्टेट सेवा सहकारी सोसायटी चे अध्यक्ष,उपाध्यक्ष,संचालक ,कर्मचारी व नित्य निधी प्रतिनिधी सह सहकार क्षेत्रातील सर्व घटकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान सहकार दिंडी नियोजन समिती माजलगाव च्या वतीने करण्यात येत आहे.

## माजलगाव सराफा असोसिएशनची कार्यकारणी जाहिर



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव सराफा असोसिएशनचे जेष्ठ सल्लागार/मार्गदर्शक आनंतदादा रूद्रवार व अध्यक्ष रामराजे रांजवण यांच्या उपस्थितीत दि. २७ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीत माजलगाव सराफा असोसिएशनची कार्यकारणी जाहिर करण्यात आली. यामध्ये माजलगाव सराफा असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी नारायण सातपुते, सचिव गजानन बोकन, कार्याध्यक्ष मंचक थोरात, सह उपाध्यक्ष सुरेश सोळंके, कोषाध्यक्ष गणेश उगले, सल्लागार राजु दाभाडे, रवी मानधने, महेश ठोंबरे, सहसचिव भागवत गायकवाड, छत्रबुज देशमुख, प्रसिध्दीप्रमुख कृष्णा कुलथे, भागवत चव्हाण, दत्ता येवले, संघटक निळकंठ महाजन, निशांत गडम, रफिक आतार, सदस्य म्हणुन सदाशिव उगले, प्रवीण शहाणे, संजय गायके, सुनिल उदावंत, केशव हरकाळ, अशोक सरवदे, सलीम जरगर, अशोक अंडील, चंद्रकांत देशमुख, दिलीप साबळे यांचा कार्यकारणीमध्ये समावेश आहे. बैठकीस प्रकाश चव्हाण, सुरेश सोनार, मंचक थोरात, राजु दाभाडे, सतीश काशीद, उल्हास रूद्रवार, नारायण सातपुते, सुरेश सोळंके, महेश ठोंबरे, रवी मानधने यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात संघटनेचे अध्यक्ष रामराजे रांजवण म्हणाले की, हॉलमार्क आल्यामुळे आपल्या व्यवसायामध्ये प्रॉफिट कमी झाले आहे त्यामुळे सर्वांनी एक भाव एक मजुरी करून विकावी जेणेकरून आपल्याला दोन पैसे होतील असे ते म्हणाले कमी भावात सोने - चांदी विकु नये असे आवाहन केले. सुत्रसंचालन गजानन बोकन यांनी केले.

## जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**बीड । प्रतिनिधी**

मराठा, ओबीसी,धनगर समाजाच्या वतीने आरक्षण मागणी अनुषंगाने आंदोलने चालु आहेत.तसेच मराठा आरक्षणाचे मागणीवरुन मनोज जरांगे हे दि. २५ जानेवारीपासून मराठा समाजाला सोबत घेऊन सामुहिक आमरण उपोषणास बसले आहेत. सध्या बीड जिल्हयात पोलीस स्टेशन केज येथे दाखल असलेल्य गुन्हयाच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष संघटना यांच्याकडून सदर गुन्हयाच्या अनुषंगाने आरोपीनां कठोर शासन व्हावे या मागणीकरिता अचानक आंदोलन करत आहेत. राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागणीसाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यदी होण्याची शक्यता आहे. तसेच दि. ११ फेब्रुवारी २०२५ पासून इयत्ता १० वी आणि २१ फेब्रुवारीपासून १२ वी बोर्डाची परिक्षा सुरु होत आहेत. यामुळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक ३० जानेवारी २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते २ फेब्रुवारी २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांच्या व्यथा आ.विजयसिंह पंडित यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मांडल्या

### नामनिर्देशित सदस्यत्व मिळाल्याने आ.पंडित यांचे जिल्हाभरातून अभिनंदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा नियोजन समितीवर नामनिर्देशित सदस्य म्हणून शासनाने आ.विजयसिंह पंडित यांची नियुक्ती केल्यामुळे त्यांच्यावर जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ.विजयसिंह पंडित यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा मांडून त्यांना न्याय देण्याची मागणी केली. महाऊर्जा कडून पी.एम. कुसूम योजनेत सौर कृषीपंपाच्या वितरणातील अनियमितता, पिक कर्ज देताना राष्ट्रीयकृत बँकांकडून विमा पॉलिसीसाठी होत असलेली आर्थिक पिळवणुक आणि थकीत पिक विमा यांसह विविध विषय आ.विजयसिंह पंडित यांनी बैठकीत मांडले. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दि.३० रोजी जिल्हा नियोजन समितीची पहिली बैठक संपन्न झाली. या बैठकीला राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे मंत्री ना.धनंजय मुंडे, पर्यावरण



तथा पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्यासह लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. बीड जिल्ह्याच्या नियोजन समितीवर नामनिर्देशित सदस्य म्हणून शासनाने गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांची नियुक्ती केल्यामुळे बैठकीतील त्यांची उपस्थिती अग्रेषित होती. जिल्हाभरातून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

पी.एम.कुसूम योजनेत आवश्यक शुल्क भरणा करून पात्र लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतरही सौरपंप अस्थापित करण्यास होत असलेला विलंब, नादुरुस्त सौरपंप वेळेवर दुरुस्त न करणे, विमा संरक्षित पंपांना विम्याचे संरक्षण न मिळणे, महावितरणकडील प्रतिक्षा यादीत होत असलेली वाढ या सर्व बाबी आ.विजयसिंह पंडित यांनी या बैठकीत मांडून महाऊर्जाकडून सौरपपाच्या संदर्भाने शेतकऱ्यांची होत असलेली अडवणुक थांबविण्याची मागणी केली. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या उमापूर शाखेत खरीप २०१६ साठी उमापूर महसुल मंडळातील १५६२ शेतकऱ्यांनी ४९.२२ लक्ष रुपयांचा विमा हप्ता भरणा करूनही बँक कर्मचाऱ्याच्या चुकीच्या नोंदीमुळे नुकसान भरपाईपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम मिळावी यासाठी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी न्यायालयीन लढाई लढली.

## कोरडे गणपती मंदिरात महागणेशयाग व महाप्रसाद

**बीड । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे बीड शहराचे ग्रामदैवत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काळे गल्ली येथील श्री संस्थान कोरडे गणपती मंदिर या ठिकाणी आज ३१ जानेवारी शुक्रवार रोजी सामुदायिक महा गणेशयाग आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तसेच दिनांक १ फेब्रुवारी शनिवार रोजी श्रींची पारंपारिक मिरवणूक आयोजित करण्यात आली आहे या दोन्ही कार्यक्रमासाठी भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.बीड शहरातील ग्रामदैवत म्हणून समजल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र



कोरडे गणपती संस्थान दरवर्षी द्वार निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करत आहे यावर्षी देखील शुक्रवार दिनांक ३१ जानेवारी रोजी सामुदायिक महा गणेशा याग आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या वेळेत श्रींची आरती करून महाप्रसाद आयोजित केला आहे तसेच दिनांक १ फेब्रुवारी रोजी प्रतिवर्षाप्रमाणे श्रींची पारंपरिक मिरवणूक शहरातून काढली जाणार आहे या मिरवणुकीसाठी दरवर्षी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात या वर्षी देखील भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे,श्रगणेशाची मिरवणूक काळे गल्ली, जुना बाजार, बलभीम चौक, कारंजा जुनी भाजी मंडई, कबाड गल्ली, माळीवेस, धोंडीपुरा मार्गे पुन्हा मंदिरात येऊन आरती केली जाणार आहे



*बालासाहेब गोपाळ यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देताना सचिव सुरेश लगड मार्केटिंग मॅनेजर विष्णू पंत साबळे आणि सरपंच शंकर आबुज*

## चरित्रसंपन्न युवक घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान मोलाचे : अप्पाराव यादव




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

'माझ्यासाठी नाही तर तुमच्यासाठी' हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीदवाक्य असून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास आणि त्यातून सामाजिक जाणिवेचे संवर्धन करून युवकांना समाजसेवा ,राष्ट्रसेवा यासाठी प्रेरित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या शिबिराच्या माध्यमातून होत आहे . यातूनच स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील चारित्र्यसंपन्न युवक - युवती घडविले जातील. हाच भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे आणि हे कार्य करण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान मोलाचे आहे. असे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य आप्पाराव यादव यांनी केले. ते येथील खोलेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मौजे तळणी ता. अंबाजोगाई येथे आयोजित 'माझ्या भारताचा युवक आणि संगणकीय साक्षरता' युवक - युवती विशेष शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.प्रीती पोहेकर, उपसरपंच जयवंताबाई गायकवाड, मुख्याध्यापक एल.बी. इंगोले, अर्चना मुंडे , महाविद्यालयाचे उपप्रचार्य डॉ. दीपक फुलारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा.डॉ. मानितकुमार वाकळे, प्रा. डॉ. रोहिणी अंकुश, प्रा. डॉ. वसंत गायकवाड आदींची उपस्थिती होती.

## तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट व जी. प. प्रा शाळेला बस सेवा सुरू

**बीड । प्रतिनिधी**

नवगण शिक्षण संस्था संचलित तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेसाठी व जी प प्रा शा तांदळवाडी घाट या दोन्ही शाळेसाठी एसटी बस सेवा विद्यार्थ्यांसाठी सुरुवात केली आहे याप्रसंगी चालक इतापे संतोष रामचंद्र व वाहक वाघुंबरे विठ्ठल वसंतराव यांचा शाळेच्या वतीने व गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच पांचाळ तात्या व प्रमुख पाहुणे म्हणून सुंदर तात्या खोसे ग्रामपंचायत सदस्य शहादेवराव खोसे डॉक्टर निवांत चव्हाण सर अविनाश राहींज हरी कुमटकर जालिंदरराव भागडे लक्ष्मणराव खोसे विनायकराव काळे रवींद्र विक्रमराव खोसे इत्यादी ग्रामस्थांची उपस्थिती होती. अंधापुरी या ठिकाणी सुद्धा एसटी महामंडळाचे वाहक आणि चालक यांचा ग्रामस्थांनी सरपंच श्री पप्पू जगताप यांनी सत्कार केला.

## सौ.के.एस.के. काकु कृषि महाविद्यालच्या पंधरा विद्यार्थ्यांची पुण्याच्या नामांकित कंपनीमध्ये कॅम्पस मुलाखती द्वारे झाली निवड

**बीड । प्रतिनिधी**

श्री अनंत कृषी विकास प्रतिष्ठान या संस्थेच्या सौ. के.एस.के काकू कृषि महाविद्यालय, बीड या ठिकाणी नुकतेच वेटरीना हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या कंपनीच्या वतीने व्हेटर्नरी सेल्स ऑफिसर व सेल्स ऑफिसर या पदाकरिता महाविद्यालयाच्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी या कॅम्पस मुलाखतीचे आयोजन दिनांक ०९ जानेवारी २०२५, गुरुवार रोजी केले होते. मुलाखतीस उपस्थित विद्यार्थ्यांपैकी पंधरा विद्यार्थ्यांची



निवड कंपनीमार्फत करण्यात आलेली आहे. ही कंपनी पशु आहार क्षेत्रामध्ये गरजेप्रमाणे आहारपूरक घटक बनवते, शेतकऱ्याना दुग्ध व्यवसाय फायदेशीर मार्गदर्शन करते तसेच वेटझोनच्या माध्यमातून, उत्पादने शेतकऱ्यांच्या दारात पोचवते. कंपनीच्या वतीने श्री अमित शिंदे, नॅशनल सेल्स ऑफिसर आणि श्री युवराज खरात, झोनल सेल्स ऑफिसर यांनी या मुलाखती घेतल्या होत्या.

## पुष्पलता देशमुख यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**



येथील गुजराती कॉलनी भागातील ज्येष्ठ नागरिक पुष्पलता लक्ष्मीकांत देशमुख (वय ६८) यांचे ३० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मोंढा रोडवरील अमरधाम येथे रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## शिवसेनेच्या ओबीसी सेल जिल्हाध्यक्षपदी धीरज दहिवाळ यांची नियुक्ती : सचिन मुळूक

### सोनार समाजाला मिळाली ओ.बी.सीं.चे प्रतिनिधित्व करण्याची संधी

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व खासदार श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशाने शिवसेना प्रणित ओबीसी सेलच्या जिल्हाध्यक्षपदी धीरज दहिवाळ यांची निवड करण्यात आली प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे. शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांच्या हस्ते दहिवाळ यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांच्या सत्कार करण्यात आला. दहिवाळ यांच्या निवडीने ओबीसी समाजातील छोटा घटक असलेल्या सोनार समाजाला प्रतिनिधित्व करण्याची संधी



मिळाली असून ओबीसी सेलच्या माध्यमातून धीरज दहीवाळ पक्ष वाढीसाठी काम करत संधीचा सोनं करतील असा विश्वास जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी व्यक्त केला.

ओबीसी व्ही जे एन टी सेनेचे प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब किसवे यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या विनंतीवरून शिवसेना प्रणित ओबीसी सेलच्या जिल्हाध्यक्षपदी धीरज दहिवाळ यांची नियुक्ती केली. बाळासाहेब भवन मुंबई येथे दहिवाळ यांना प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर, लातूर सह संपर्कप्रमुख रवी गुरमे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले व सत्कार करण्यात आला. यावेळी दहिवाळ यांनी शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विचार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवावे तसेच अधिकाधिक युवकांना पक्ष संघटनेमध्ये सामील करून घ्यावे असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.

## मराठी पत्रकार परीषदेच्या पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित रहा: विशाल साळुंके



**बीड । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषद मुंबई, व परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघ व सेलू तालुका मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण तसेच पत्रकार मेळावा दि. १ फेब्रुवारी रोजी परभणी जिल्हयातील सेलू येथे आयोजित केला आहे. या मेळाव्यास बीड जिल्हयातील तालुका पदाधिकार्यांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके यांनी केले आहे.

हा पुरस्कार कार्यक्रम साई नाट्यगृह सेलु येथे दि.१ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख हे राहणार आहे.

